**कृषि आयुक्तालय ,महाराष्ट्र राज्य,**
**शिवाजीनगर पुणे-४११००५**
जा.क्र.कृआ-२०१५/कं.मान्यता/फलो-४/५६६/२०१५
दिनांक : ७ जून,२०१५

## आदेश

**विषय** :- सन २०१५-१६ साठी तुषार सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नविन नोंदणी/ नोंदणी केलेल्या कंपनीच्या नुतीनकरणास मान्यता प्रदान करणेबाबत.

**संदर्भ :-** १) कृषि व पदुम विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र सुसिंयो/२११५/प्रक्र-१३३/४-अे, दि. २४.४.२०१५
२) राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान मार्गदर्शक सुचना मधील APPENDIX-IA मधील परिच्छेद-क्र-१

वर नमूद केलेल्या संदर्भ -१ मधील प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-१ व परिशिष्ठ-२ मध्ये नमूद केलेल्या तुषार सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नविन नोंदणी/ नुतनीकरणास सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्हयामध्ये तुषार सिंचनाचे काम करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. या मध्ये २० नविन व ४ नुतनीकरण केलेल्या अशा एकूण २४ तुषार सिंचन संच उत्पादक कंपन्यांचा समावेश आहे.

१. सुक्ष्म सिंचन योजना अंमलबजावणीसाठी या आदेशान्वये तुषार सिंचन संच उत्पादक कंपन्यांची करण्यात आलेली नोंदणी तीन वर्षासाठी वैध राहिल. मात्र सदरहू कंपन्यांनी प्रत्येक वर्षी कृषि आयुक्तालयाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरुन नोंदणीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

२ कृषि आयुक्तालयस्तरावर दि. १९.११.२०१४ रोजी सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनी प्रतिनिधी सोबत झालेल्या बैठकीत कृषि आयुक्तालय व सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी यांच्यामध्ये करावयाचा अंतिम केलेल्या करारनाम्याच्या नमुन्यामध्ये रु.१००/- च्या स्टॅपपेपरवर नोटराईज्ड करारनामा करुन तो एक महिन्याच्या आंत सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीने आयुक्तालयास सादर करावयाचा आहे.

३ सोबतच्या यादीत नमूद केलेल्या तुषार सिंचन संच उत्पादक कंपन्यांची सन २०१५-१६ साठी नोंदणी केलेली आहे त्या सर्व कंपन्यांनी प्रत्येकी रु.१,००,०००/-रकमेची बँक गॅरंटी रु.१००/-च्या स्टॅपपेपरवर एक महिन्याच्या आंत कृषि आयुक्तालयास सादर करावयाची आहे.

४ या आदेशान्वये नोंदणी केलेल्या कंपन्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रत्येक घटकांच्या बीआयएस मुदतीपर्यत त्या कंपनीची नोंदणी/नुतनीकरण घटक निहाय बीआयएसच्या मुदतीपर्यत वैध राहिल.बीआयएस नुतनीकरणाची कागदपत्रे विहित मुदतीत कृषि आयुक्तालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधित कंपनीची राहिल. अशी कागदपत्रे

वेळेत सादर न केल्यास त्या कंपनीची नोंदणी/नुतनीकरण घटकनिहाय बीआयएस मुदतीच्या अंतिम तारखेनंतर आपोआप रद्द होईल.

५ वरील प्रमाणे विहित घटकांच्या बीआयएस नोंदणीबाबतची /नुतनीकरणाची प्रमाणपत्रे संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सुध्दा वर नमुद केल्याप्रमाणे वेळेत सादर करणे संबंधीत कंपन्याना बंधनकारक राहील.

६ नोंदणी / नुतनीकरणाच्या वेळी नोंदणीकृत कंपन्यानी सादर केलेल्या दरपत्रकातील दरापेक्षा जास्त दराने कोणत्याही घटकांची विक्री करता येणार नाही. तसेच सदरचे दरपत्रक कृषि आयुक्तालयाच्या ई-ठिबक आज्ञावलीवर नोंदणीवेळी नोंदणीकृत कंपन्यांनी भरणे आवश्यक आहे. नोंदणीकृत कंपन्यांनी त्यांच्या दरपत्रकात त्या आर्थिक वर्षात वाढ किंवा घट केल्यास ई-ठिबक अज्ञावलीवर भरणे व कृषि आयुक्तालयास त्वरित कळविणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

७ मार्गदर्शक सुचनामध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक जिल्हयात विक्री पश्चात सेवा केंद्र उभारणी करणे व त्याबाबतची आवश्यक ती माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करुन त्याची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत नोंदणीकृत कंपन्यांची राहिल. नोंदणी प्राप्त होताच विक्री पश्चात सेवा केंद्राची एक महिन्यात तपासणी करुन घेऊन त्याचा अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून सन २०१५-१६ साठी नोंदणी करण्यात येत आहे.

८ नोंदणीकृत कंपन्यांनी मान्यता दिलेल्या प्रत्येक जिल्हयांतील त्यांच्या वितरकांची यादी नोंदणीसाठी संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडे सादर करुन त्यांची नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.

९ सन २०१४-१५ च्या मार्गदर्शक सुचनामधील परिच्छेद-७ नुसार व त्यातील परिशिष्ट-१९ मधील विहित नमुन्यात वितरकाने साठा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदरची नोंदवही सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीनी व संबधित तालुका कृषि अधिकारी यांनी संयुक्तरित्या प्रमाणित करणे बंधनकारक आहे.तसेच या मार्गदर्शक सुचनामधील परिच्छेद ७(६) नुसार नोंदणीकृत कंपनीने उत्पादीत केलेल्या व वितरकांना पुरवठा केलेल्या सर्व घटकांचा घटक निहाय अहवाल दरमहा महिना संपताच पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत कृषि आयुक्तालयास सादर करणे आवश्यक आहे.

१० नोंदणीकृत कंपन्यानी नियुक्त केलेल्या अधिकृत वितरक/विक्रेते,अधिकृत प्रतिनिधी यांनी अनियमितता अथवा शेतकरी, शासन इत्यादीची फसवणूक केल्यास त्या बाबीस वितरक/विक्रेत्या बरोबरच कंपनी प्रतिनिधी व कंपनीसुध्दा जबाबदार राहील.

११ सन २०१५-१६ या वर्षामध्ये केंद्र/राज्य शासन, कृषि आयुक्तालयस्तरावरुन वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचना, अटी व शर्ती इत्यादींचे पालन व त्यानुसार अंमलबजावणी करण्याची जबाबदारी नोंदणीकृत कंपन्यांवर राहील.

१२ सन २०१५-१६ साठी तात्पुरत्या (Tentitive) स्वरुपातील मार्गदर्शक सुचना कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.कृआ/फलो-४/शेपाव्य/२०१५-१६/अंमासु/४५७/२०१५,दि.८.५.२०१५अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्या तात्पुरत्या स्वरुपाच्या असून यापुढे केंद्र, राज्य शासन, कृषि आयुक्तालयस्तरावरुन वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सुचना, अटी व शर्ती सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्या व त्यांच्या अधिकृत वितरकांवर बंधनकारक राहतील.

**सोबत-१. उत्पादकांच्या व वितरकांच्या करारनाम्याचा मसुदा**

**२. नोंदणी/नुतनीकरणास मान्यता देण्यात आलेल्या तुषार सिंचन संच उत्पादकांची यादी**

**संचालक फलोत्पादन**

**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५**

**प्रति,**

**मे. ..............................**

**..............................**

**प्रतिलीपी-**

**१ विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)**

**२ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

**२/- यांना माहितीसाठी व पुढील प्रमाणे कार्यवाहीसाठी अग्रेषित**

१ सन २०१५-१६ या वर्षासाठी सुध्दा जिल्हास्तरावर संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हयांतील वितरकांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वितरक नोंदणीसाठी आवश्यक असलेले व कृषि आयुक्तालयाने विहित केलेले शुल्क रु.२७५०/- (अक्षरी रु.दोन हजार सातशे पन्नास फक्त) भरुन घ्यावे. तसेच रु.१०,०००/-(अक्षरी रु. दहा हजार फक्त) रकमेची बँक गॅरंटी घेऊन वितरकाची नोंदणी करावी.(ठिबक व तुषार याकरिता शुल्क स्वतंत्र भरण्याची आवश्यकता नाही.)

२ संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व त्यांच्या जिल्हयांतील सुक्ष्म सिंचन वितरक या दोघामधील कृषि आयुक्तालयाने विहित करुन दिलेल्या नमुन्यातील करारनामा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी रु.१००/-च्या स्टॅपपेपरवर नोटराइज्ड करुन घ्यावा. सदर करारनाम्यामध्ये " कृषि विभागाने सुक्ष्म सिंचन कार्यक्रम राबविण्यासाठी त्यांना आवश्यक असणारे सहकार्य वेळोवेळी मागितलेली माहिती तसेच बिलांच्या स्वाक्षरीत छायांकित प्रती वितरकाने विहित मुदतीत दिल्या नाहीत तर त्यांची सन २०१५-१६ साठीची नोंदणी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून रद्द करण्यात येईल. तसेच पुढील आर्थिक वर्षात त्यांची नोंदणी/ नुतनीकरण करण्यात येणार नाही " या अटीचा नव्याने अंर्तभाव करावा.

३ नोंदणीकृत कंपनीच्या जिल्हयांतील विक्री पश्चात सेवा केंद्राची तपासणी सन २०१४-१५ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांमधील परिशिष्ट-१४ प्रमाणे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी स्वतः किंवा त्यांच्या अधिनस्त असलेल्या गट-अ अथवा गट-ब मधील अधिकाऱ्यामार्फत कंपनीची कृषि आयुक्तालयस्तरावरुन नोंदणी झाल्यापासून एक महिन्याच्या आंत तपासणी करुन त्यास मान्यता द्यावी.

४ वितरकाने विहित नमुन्यात साठा नोंदवही ठेवणेबाबत विहित प्रपत्र व त्याबाबतचे आदेश जिल्हास्तरावरुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी निर्गमित करावेत.

५ सन २०१५-१६ मध्ये सुक्ष्म सिंचन योजना संपूर्णपणे ई-ठिबक प्रणालीद्वारे राबविण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीत कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता कंपन्या त्यांचे वितरक /विक्रेते तसेच कृषि विभागाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे.

**संचालक फलोत्पादन**

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५